श्री. दत्तु भुजा राऊत (मयत) वारस सुभद्राबाई दत्तु राऊत व इतर रा. कवठा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद यांच्या भुकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता संपादित जमिनीचा मा.दिवाणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार भुसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम-१८ अन्वये वाढीव मोबदला अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः पुनर्व-२०१९/२०७/प्र.क्र.४८/र-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

तारीख: ०४/०६/२०१९

वाचा -

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.अकवा/न्यायप्रकरण/१०९९/प्र.क्र.१५२/अ-४, दि.२४.१२.२००३

२) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०१८/प्र.क्र.६७/ब-१, दि.९.३.२०१८

३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्र. २०१९/पुनर्वसन/कक्ष-१/कावि-९७, दि.४.५.२०१९

प्रस्तावना -

श्री. दत्तु भुजा राऊत रा. कवठा, ता.उमरगा, जि. उस्मानाबाद यांची क्षेत्र ३ हेक्टर ८६ आर जमीन भुकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी ताब्यात घेण्यात आली होती. तथापि, जमिनीचा योग्य मोबदला न मिळाल्याने श्री. दत्तु भुजा राऊत (मयत) यांचे वारस यांनी भूसंपादन अधिनियम १९८४ च्या कलम १८ नूसार वाढीव मोबदला मिळण्याबाबत मा. दिवाणी न्यायालयामध्ये शासनाविरुद्ध प्रकरण दाखल केले असता, मा. दिवाणी न्यायालयाने दि. १२/०१/२०१७ रोजी भूधारकास वाढीव मोबदला देण्याचा निर्णय दिला आहे. मा. दिवाणी न्यायालयाच्या सदर निर्णयाविरुद्ध अपील न करण्याबाबत विधी व न्याय विभागाने अभिप्राय दिले आहेत. सदर मोबदला संबंधित भूधारकांस मंजूर करण्याचे अधिकार संदर्भाधिन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानूसार मंजूरी आदेश काढण्यापूर्वी निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने मा. दिवाणी न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार संपादित जमिनीचा वाढीव मोबदला अदा करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी संदर्भ क्र.३ अन्वये निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणात रुपये २०,९६,०७३/- इतका निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

त्यानुसार, श्री. दत्तु भुजा राऊत (मयत) वारस सुभद्राबाई दत्तु राऊत व इतर रा. कवठा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद यांच्या भुकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता संपादित जमिनीचा मा.दिवाणी

न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार भुसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम-१८ अन्वये वाढीव मोबदला अदा करण्याकरिता रु. २०,९६,०७३/- एवढा निधी सन २०१९-२०२० या चालू वित्तीय वर्षात खर्च करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. त्यानूसार श्री. दत्तु भुजा राऊत (मयत) वारस सुभद्राबाई दत्तु राऊत व इतर रा. कवठा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद यांच्या भुकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता संपादित जमिनीचा मा.दिवाणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार भुसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम-१८ अन्वये वाढीव मोबदला अदा करण्यासाठी **सन २०१९-२० या वित्तीय वर्षात BEAMS प्रणालीवर उपलब्ध तरतूदीतून रु. २०,९६,०७३/- (अक्षरी रुपये वीस लक्ष शहाण्णव हजार त्र्याहत्तर फक्त) एवढा निधी "मागणी क्रमांक सी-०९, लेखाशीर्ष ४२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च, ०१ पुनर्वसन, २०१ इतर पुनर्वसन योजना (००)(००)(०१) इतर पुनर्वसन योजना (अनिवार्य) (४२३५०१०८) ५०-इतर खर्च (भारित) " या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात उपलब्ध तरतूदीतून विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना खालील अटींच्या अधिन राहून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

वित्तीय शिस्तीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांनी खालील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी भूधारकास अदा करण्यासाठी परिगणना केलेली रु. २०,९६,०७३/- एवढी वाढीव मोबदला रक्कम अंतिम व योग्य असल्याची खातरजमा करून सदर रक्कम भूधारकास तात्काळ अदा करावी.

२) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी मा.न्यायालयाच्या निर्णयानूसार वाढीव मोबदला मंजूरीचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

३) अदा करण्यासाठी मंजूर केलेल्या बाबी व्यतिरीक्त अन्य बाबींवर अनुदान खर्च होणार नाही यांची विभागीय आयुक्त यांनी दक्षता घ्यावी.

४) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेला निधीपेक्षा जास्त निधी कोणत्याही परिस्थितीत खर्च होणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

५) मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव मोबदला अदा करण्यास विलंब होणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

६) सदरच्या आदेशातील नमूद मुख्य लेखाशीर्ष मागणी क्र.सी-०९, लेखाशीर्ष ४२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च, ०१ पुनर्वसन, २०१ इतर पुनर्वसन योजना, (००)(००)(०१) इतर पुनर्वसन योजना (अनिवार्य) (४२३५ ०१०८) ५०-इतर खर्च (भारित) या लेखाशीर्षांतर्गत वितरित केलेला कोणताही निधी शिल्लक रहाणार नाही अथवा सदर आदेशान्वये प्राप्त होणारा निधी कोणत्याही Operational Bank Account /PLA (स्वीय प्रपंची खाते) मध्ये जमा करून ठेवण्यात येणार नाही, याची संबंधित अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

(७) मुख्यलेखाशीर्ष मागणी क्र. सी-०९, मुख्य लेखाशीर्ष ४२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च, ०१ पुनर्वसन, २०१ इतर पुनर्वसन योजना (००)(००)(०१) इतर पुनर्वसन योजना (अनिवार्य) (४२३५०१०८) ५०-इतर खर्च (भारित) या लेखाशीर्षांतर्गत संबंधित संनियत्रण अधिकारी यांनी होणाऱ्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवून शासनाच्या प्रचलित लेखा पध्दतीनुसार ते महालेखापाल यांना सादर करावेत. तद्नुषंगाने या लेखाशीर्षाखाली होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ, विनियोजन लेखे इत्यादि कामे संबंधितांनी प्रचलित पध्दतीप्रमाणे करावीत.

८) यासंदर्भातील खर्च विवरणपत्रे/ अहवाल शासनास न चुकता सादर करण्यात यावीत. वरील निधीसंबंधित खर्च ताळमेळाची विवरणपत्रे महालेखापाल कार्यालयाच्या Reconcillation Slip सह शासनास न चुकता सादर करावीत.

९) संबंधित अधिकारी यांनी या आदेशान्वये वितरीत निधीचे उपयोजन प्रमाणपत्र Utilisation Certificate महालेखापाल कार्यालय,संबंधित जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त/शासनास तातडीने सादर करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०४१७३५२७७८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f113316b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2019.06.04 17:42:00 +05'30'

(दयानंद शं. मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
२. उप आयुक्त (पुनर्वसन), औरंगाबाद
३. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद
४. उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, उमरगा
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१,नागपूर-२ (२ प्रतीत)
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१, नागपूर-२ (२ प्रतीत)
७. जिल्हा कोषागार अधिकारी, उस्मानाबाद
८. महसूल व वन विभाग, कक्ष अधिकारी ब-१/पीएसी, मंत्रालय, मुंबई - ३२
९. निवडनस्ती कार्यासन र-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

*****